# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 22/06/2020 (सोमवार)
(दुपार)

फसवणुक

पो.स्टे. सावनेर :-अंतर्गत 09 कि.मी. अंतरावर शक्ती नगर सावनेर येथे दिनांक 01/06/2020 चे 14.20 वा. दरम्यान फिर्यादी नामे- राहुल सुभेदार पाल, वय 24 वर्ष, रा. शक्ती नगर, सावनेर ता. सावनेर यांच्या फोन वर अज्ञात आरोपीने फोन करून म्हटले की, 'मेल आय डी 600 फॉर्म भरून त्यापैकी 60 चे वर फॉर्म चुकीचे भरल्यास पॅनल्टी भरावी लागेल' असे म्हणुन फिर्यादी कडुन 10,500/-रू., 36,800/-रू, 8,900/-रू. असे एकुण कि. 56,200/-रू. क्यु आर कोड वायबीएल वर भरण्यास सांगुन ऑनलाईन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सवनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 420 भादंवी, 66 (डी) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. अशोक कोळी हे करीत आहे.

दुखापत

पो.स्टे. नरखेड :- अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा गायमुख पांढरी येथे दिनांक 21/06/2020 चे 13:00 वा. ते 13.30 वा. दरम्यान आरोपी नामे- महादेव धन्नु युवनाती, वय 28 वर्ष, रा. गायमुख पांढरी याने फिर्यादी नामे- सौ. अनिता नंदु युवनाती, वय 37 वर्ष, रा. गायमुख पांढरी यांना जुन्या भांडणाचे कारणावरून शिवीगाळ केली. तसेच आरोपीने फिर्यादीच्या घरी घुसून फिर्यादीस हातातील लोखंडी विळयाने हाताचे कलाईवर मारून जखमी केले. यानंतर आरोपीने दिपक उईके हा मध्यस्थी गेला असता त्याला सुद्धा डावे हातावर उभारीने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506, 448 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक गजानन शेन्डे 8830107633 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर